

वैशाली पाटील
त्या
भयानक
रात्री

# त्या भयानक रात्री

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या निर्मितीसाठी काही लोकांना वेळ व पैसा खर्च करावा लागला आहे.

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल व ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# त्या भयानक रात्री

**वैशाली पाटील**

ई साहित्य प्रतिष्ठान

# त्या भयानक रात्री

## लेखिका : वैशाली पाटील

पत्ता :c/o निवास पांडुरंग पाटील .

At post : दिवशी बुद्रुक (मारुल हवेली) , तालुका :पाटण , जिल्हा : सातारा

फोन नंबर : 7404524240

mail : vaishalipatil1590@gmail.com

Facebook page :@ShabdanchaKhelHaSara

Web link : Manatalkahi1.wordpress.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : २६ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**नमस्कार वाचक मित्र-मैत्रिणींनो ,**



मी वैशाली विजय पाटील. एक गृहिणी आहे. दोन गोड मुलींची आई. लहापणापासून खूप हौस शिकून काहीतरी मोठं व्हावं, नाव कमवावं...पण दहा बारा वर्षांमागे गावची परिस्थिती अशी की, मुलीने दहावी शिकली की बस, द्या लग्न लावून. काय करणार शाळा शिकून, चूल नी मुलच करायचं आहे.. अशी परिस्थिती असल्यामुळे ,आणि घरची परिस्थिती ही बेताचीच..

लग्न झाल्यामुळे पुढे काही करू शकले नाही.. पण मन काही शांत बसणाऱ्यातलं नव्हतं... काहीना काही करत रहायचं, एवढाच ध्यास.. मग स्वतःचे ड्रेस स्वतः शीव... गाण्याची खूप आवड, मग गुपचूप सेकंड हॅन्ड गिटार घेऊन ते ही शिकलं, पण पोरांना सांभाळत ,सगळं अर्धच...कोणतीच आवड पूर्ण झाली नाही..

वाचनाची आवड मात्र निरंतर... त्याला खतपाणी दहावी नंतरची दोन वर्ष... मुद्दामहून आलेल्या स्थळाला नकार द्यायचा, कारण कदाचित शिकायला मिळेल. शिकणं काही नशिबात नव्हतं, पण महान लेखकांचे विचार त्यांच्या कथा, कादंबऱ्या खूप वाचल्या. त्यासाठी आईचं प्रोत्साहन...रात्र रात्र जागून पुस्तकं वाचून पूर्ण केली..

"भगवतगीता" देखील वाचली, पण म्हणतात ना... काही गोष्टी ज्या त्या वयात समजतात... तेव्हा काही समजली नाही.. सर्वात जास्त आवडलेली कादंबरी... वि. स. खांडेकरांची "ययाती”. अहाहा.. काय शब्दरचना! आणि शृंगारवर्णन तर भारावून टाकण्याजोगं. रोज म्हणलं तरी वाचेन मी ती कादंबरी एवढं प्रेम आहे माझं, त्यातील शब्दांवर, शब्द रचनेवर...

त्यानंतर आवडलेली अजून एक भारी कादंबरी. शिवाजी सावंत यांची, "मृत्युंजय". तेव्हापासून मला अर्जुन काय कृष्ण भगवान पेक्षाही जास्त दानशूर "कर्ण" आवडायला लागला. ही कादंबरी मी, माझ्या दुसऱ्या मुलीच्या वेळी आईकडे होते चार महिने... लहान पोरगी रात्रभर जागी असायची.. मग ती जागी... आणि मी कादंबरीसाठी जागी... चार महिने लागले छोटीला सांभाळत ही कादंबरी पूर्ण करायला.. पण सासरी जायच्या आधी वाचून पूर्ण केली... कारण ती माहेरच्या वाचनालयातली होती...

लग्न झाल्यावर नेटवर वाचनाची सवय लागली, कारण पुस्तकं मिळणं अवघड... बारा वर्षे झाली, सलग वाचतेय मी.. अचानक वाचता वाचता वाटलं, आपणही लिहून बघावं..

केला प्रयत्न... चुकतमाकत...तोही यशस्वी झाला. नंतर इ साहित्य प्रतिष्ठानविषयी समजलं.. प्रयत्न करून बघितला... इथे संधी मिळतेय का , आणि ती इच्छा माझी लवकरचं "त्या भयानक रात्री" या कथेद्वारे पूर्ण झाली...

प्रथम आभार "ई साहीत्य प्रतिष्ठान " चे.. ज्यांनी आम्हा नवोदित लेखक वर्गाला एक मंच उपलब्ध करून दिला. जिथे आम्ही आमच्या भावना मग त्या काल्पनिक असो, किंवा रोजच्या जीवनावर अवलंबून असो.. त्या इथे शब्दरूपात तुमच्या समोर मांडू शकतो..

आशा आहे , माझा " ई साहित्य प्रतिष्ठान " वरील लेखनाचा पहिला प्रयत्न , वाचक वर्गाला नक्की आवडेल....


तुमचीच....

**वैशु पाटील...**

माझे इष्ट ...माझे आराध्य ...

मला तर वाटतं यांच्या प्रेरणेमुळेच मी लिहू शकले . यांनीच मला कळत नकळत त्यांच्या दिव्य शक्तीने लिहण्यास मार्गदर्शन केले असावे .... म्हणून मी लिहितेय ...लिहू शकतेय ..

माझी पहिली कथा ... माझे गुरू ..अक्कलकोट निवासी .. श्री स्वामी समर्थ ।। महाराजांचरणी अर्पण ...



**स्वामी माझे गुरू , स्वामी कल्पतरू ।**

**सौख्याचे सागरू , स्वामी माझे ।।**

**स्वामी ओम । श्री स्वामी समर्थ ।। जय जय स्वामी समर्थ ।।**

# त्या भयानक रात्री

या कथेतील पात्रं, घटना, स्थान सर्व काल्पनिक आहे.

याचा कुठल्याही जीवित व्यक्ती वा वस्तूही संबन्ध नाही

# 1

आकाशात काळ्याकुट्ट ढगांनी केव्हाची हजेरी लावली होती. दिवस असूनही रात्रीसारखा अंधार सगळीकडे पसरला होता. रानातील चिटपाखरेही आपापली जागा धरून केव्हाच बसली होती. कारण त्यांनाही माहीत होतं, आजचा पाऊस काही वेगळाच बरसतोय. आज नक्कीच काहीतरी अमानवीय घडणार आहे.

अशातच, एक सुंदर, नाजूकशी, गोरीपान थोडी स्टायलिश, ब्लू कलरची जीन्स आणि यल्लो कलरचा क्रॉप टॉप घातलेली मुलगी शिवानी.

हो शिवानी, अगदी अनवाणी धावत धावत त्या अंधाऱ्या काळोख्या रात्री आसरा शोधत होती. घाबरलेली भेदरलेली एकटीच ती, जिवाच्या आकांताने पळत होती. कुठेतरी तिला आसरा मिळावा या विचारात असतानाच समोर काळ्याकुट्ट अंधारात, त्या घनदाट झाडांच्या मागे तिला काहीतरी दिसलं.

क्षणभर ती थांबली. झुडूपांच्या काटेरी फांद्या बाजूला करत तिने समोर बघितलं. एवढ्या काळोख्या अंधारात मुसळधार पावसातही, त्याच्यावर एक वेगळीच चमक होती. तिचा शोध पूर्ण झाला होता. त्या काही झाडाझुडुपांपलीकडे एक भलामोठ्ठा वाडा अंधारात आपलं गुढ लपवून उभा होता. निदान हा पाऊस थांबेपर्यंत तरी आपल्याला आसरा मिळाला आणि आपल्या पाठीमागे ते जे काही आहे त्यापासून या वाड्यात गेल्यावर तरी आपण नक्कीच वाचू.. ह्या विचारात ती वाड्याच्या दिशेने पळू लागली...

वाडाच तो, जरी बाहेरून निर्जीव भासत असला तरी त्याच्या आत काळोख्या अंधारात सामान्य जनांच्या आकलनशक्ती पलीकडच्या हालचाली चालू होत्या. त्याला शिवानीचं काय, आजूबाजूला असलेले पशू पक्षी, झाडे झुडुपे, मुसळधार कोसळत असलेला पाऊस, जोरजोरात

वाहणारा वारा सगळे सगळेच अगदी अनभिज्ञ होते.. खुप मोठं गूढ लपवून होता तो जुना, ठिक ठिकाणी दुभांगलेला, वर्षानुवर्षे उभा राहुन ऊन, वारा, पाऊस झेलून कालानुरूप अगदी जीर्ण झालेला तो, अंधारात उभा असलेला, पाहताक्षणी एखाद्याला आपल्या कवेत सामावून घेऊन कुठे तरी काळया कुट्ट अंधारात गुडूप करून टाकेल असा वाटणारा तो भयानक, भलामोठा, अजस्त्र श्वापदा सारखा पसरलेला तो वाडा.

तो वाडा बघताक्षणी शिवानीला काहीतरी अस्पष्टस, काहीतरी वेगळं, अमानवीय जाणवलं.. अचानक मागून एक थंड वाऱ्याची झुळूक तिच्या मऊशार, रेशमी केसांतून तिच्या मानेला येऊन स्पर्शून गेली. काहीवेळ तिला समजलेच नाही की ती नक्की वाऱ्याची झुळूकच होती की कोणीतरी जबरदस्ती तिला पकडू पाहत होतं. मागे फिरून बघते तर बस जोरजोरात कोसळणारा पाऊस, घनदाट झाडी आणि काळोख्या अंधारात उभी असलेली ती याव्यतिरिक्त काहीही नव्हतं. ती घाबरली, अचानक तिच्या लक्षात आलं, मघापासून काहीतरी आहे जे तिचा पाठलाग करत आहे.

त्याच्यापासून जीव वाचवण्यासाठी आपण आपली बंद गाडी रस्त्यात उभी करून इथं जंगलात या मुसळधार पावसात चिखलाची पर्वा न करता, वाट दिसेल तिकडे धावत, पळत आलो आहोत.

"कोणीतरी आपला पाठलाग", हे आठवताच तिच्या अंगात एकच शरशिरी आली. भितीने घाबरून घास कोरडा पडला होता तिचा. भोवळ यायचीच काही बाकी होती फक्त तिला. अशात तिनं ठरवलं. आता इथं थांबून काहीएक फायदा नाही. ते जे कोणी आहे ते माझ्यापर्यंत पोहचायच्या आधी मला काहीतरी करायला हवं, आणि ती अंगात असेल नसेल तेवढा जीव एकवटून भर पावसातून, काळोख्या अंधारातून, काट्याकुट्यांची पर्वा न करता बेभान पळत सुटली त्या गूढ, अनाकलनीय वाड्याच्या दिशेने.

-----------

पाऊस थांबायचं नाव घेत नव्हता, विजांचा थयथयाट सुरूच होता आणि इतक्यात कुणीतरी त्या गूढ, रहस्यमयी वाड्याचं भलं मोठं दार ठोठावलं....

प्लिज, दार उघडा कोणी आहे का आत.... प्लिज, लवकर दार उघडा कोणी आहे का आत... प्लिज, मला खूप भीती वाटतेय, तिथे... तिथे त्या काळोखात कोणीतरी आहे. ते माझ्याकडेच रोखून पाहत आहे.

खूप घाबरलेली होती शिवानी. तिच्या आवाजावरूनच ते जाणवत होतं. रडून रडून डोळे लाल झाले होते. अक्षरशः जीव मुठीत घेऊन ती पळत पळत या अंधारात असलेल्या जुन्या वाड्यात आली होती. स्वतःलाच दोष देत की मी हा मूर्खपणा का केला, का आले मम्मा बरोबर भांडण करून, तिचं तरी काय चुकलं होतं. आपल्या चांगल्यासाठीच तर ती सांगत असते.

तिचं ऐकलं असतं तर माझ्यावर ही वेळ नसती आली. मम्मा मला माफ कर खूप वाईट आहे मी, तुझं काही ऐकत नाही, खुप चुकले मी. हे तिच्या मनात असतानाच ज्या दरवाजावर ती मघापासून थाप मारत होती तो करकर आवाज करत उघडला गेला, जसं काही किती वर्षांपासून तो उघडलाच गेला नसावा. बिचाऱ्या शिवानीला तरी काय माहीत तो दरवाजा, तो जुना वाडा, सावजाचीच वाट बघत होता, कोण एकदा येतंय आणि फसतंय माझ्या जाळ्यात....

खरंतर शिवानीसाठी हे सगळं आकलनशक्तीच्या पलीकडे होतं की अगदी जीर्ण झालेला, मोडकळीला आलेला, केव्हाही कोसळून उध्वस्त होईल अशा परिस्थितीत असलेला वाडा. या वाड्याचं दार आतून बंद कसं. आपण खुप घाबरलेलं असल्यामुळे, भीतीमुळे आपल्याला काही समजलं नाही त्यामुळे आपण आवाज देत होतो, दार उघडण्यासाठी. पण अशा जीर्ण झालेल्या वाडयाचं दार कोणी कसं उघडू शकतं. हा तर किती काळापासून बंद असेल, बंद आहे.

तेवढ्यात.....

आतून एक भारदार, पुरुषी आवाज ऐकू आला... या आत या अशा बाहेर का उभ्या तुम्ही, पाऊस खूप आहे बाहेर, रात्रही खूप झालेय आणि अशा अवेळी तुम्ही इथे या जंगलात काय करत आहात ?... भीती वगैरे काही आहे की नाही तुम्हाला, अशा एकट्या तुम्ही, बरोबर कोणी नाही तुमच्या, अशावेळी तुमच्या बरोबर काहिही अघटित होऊ शकत... तुम्ही आता तुमच्या घरी असायला हवं होतं.... ना, की अशा काळोख्या रात्री घनदाट जंगलात.

प्रथम तर शिवानी अगदी ब्लँक झाली, आताच तिच्या मनात हा विचार येऊन गेला, किती काळांपासून हा वाडा बंद आहे, मी मूर्खासारखी दार बडवतेय, कोणीही उघडणार नाही माहीत असून. पण चक्क या जीर्ण वाड्याचं दार उघडलं गेलं आहे. तोही एका पुरुषाचा आवाज, हे कसं शक्य आहे. कि मी स्वप्नात आहे. अशातही तिने स्वतःला एक चिमटा काढून बघितला, कळवळली ती.

अरे ! जे समोर घडतंय ते सर्व खरं आहे, आपण स्वप्नात नाही आहोत आणि वाड्याचा भलामोठा दरवाजा जो आपल्याला वाटलं होतं उघडणार नाही ते उघडला गेला आहे. तोही माझ्याच वयाच्या थोड्याफार फरकाने मोठ्या असलेल्या एका भारदस्त तरुणाने...

आतून अजून एक स्त्रीचा आवाज ऐकू आला, अरे मुकुंद आत तरी घेणार आहेस का त्या वाट चुकलेल्या वाटसरूला की बाहेर थांबवूनच सगळे प्रश्न विचारणार आहेस. बिचारी भिजली असेल पावसात, घाबरली असेल अंधाराला आणि तू अजून बाहेर थांबवलं आहेस तिला.

शिवानीच्या मनात शंकेची पाल चुकचुकली, एकतर अशा जुन्या.. जीर्ण वाड्याकडे कोणी पाहणं देखील मुश्किल, आणि त्याच वाड्यात कोणी तरी वास्तव्य करून आहे. आणि त्याच्याबरोबर एक स्त्री देखील आहे.... आणि सगळयात महत्वाची गोष्ट की या ज्या कोणी आत आहेत, आतून बोलत आहेत. त्या वाड्याच्या आत आहेत त्यांनी मला पाहिलं देखील नाही, तरी त्या एवढं अचूकपणे माझ्याविषयी कसं सांगू शकतात. ती मनातल्या मनात म्हणाली खरंच मी किती मूर्ख आहे, ही वेळ आहे का या सर्वांचा विचार करायची. तूर्तास तरी मला आत जायला हवंय, त्या काळया सावली पासून, जी केव्हापासून माझ्या पाठीमागे आहे...

त्या काळया सावलीपासून वाचण्यासाठी ती भर पावसातून, एवढ्या अंधाऱ्या रात्री, बंद गाडी आहे अशी उभी करून जंगलात पळत सुटली होती... कारण ती सावली तिचा पाठलाग सोडण्यास तयार नव्हती... शिवानीने रस्ता बदलला की ती सावलीही रस्ता बदलायची. हिने गाडी थांबवली की ती सावलीही थोड्या अंतराच्या फरकावर थांबायची. शिवानीने लांबून बघितले की नक्की ते काय आहे जे माझ्या पाठीमागे लागलं आहे, माझा पिच्छा सोडेना. तर ते जे काही होतं ते अस्पष्ट असं एक मोठाला काळा ठिपका असल्यासारखं भासत होतं. पण ते खूप भयानक होतं. म्हणून तर ती जीव मुठीत धरून कुठे निवारा मिळतो का, कोणी सोबतीला भेटत का यासाठी त्या काळोख्या घनदाट जंगलात शिरली होतीं.

ती वाड्याच्या आत प्रवेश करणार एवढयात तिने हळूच मागे वळुन पाहिले, त्या अंधारात मघाशी जी काळी सावली होती ती त्या झाडाझुडुपांमध्ये दिसतेय का, ती आश्चर्यचकित झाली... तिथे काहीच नव्हतं... तिला कळलंच नाही असं कसं झालं.... आतापर्यंत जी अमानवी शक्ती माझ्या मागे होती, तिच्यामुळे मला इथवर यावं लागलं, रानावनातून, काट्याकुट्यातून या जुन्या वाड्यात. मग ती शक्ती अचानक अदृश्य कशी होऊ शकते.

तिला वाटलं कदाचित समोरच्या व्यक्तीने दार उघडल्यामुळे ती अदृश्य अमानवी शक्ती घाबरून.. गुप्त झाली असेल. पण त्या निरागस शिवानीला हे थोडी माहिती होतं की हा सगळा डाव तिच्या इथं येण्यासाठी तर रचला गेला होता. नाहीतर शुल्लकशा गोष्टीवरून आईबरोबर भांडण करून ती अशी रात्री अपरात्री एकटी, कोणालाही न सांगता, ना कोणाला बरोबर घेता घरातून बाहेर थोडीच पडली असती.

तेवढ्यात समोर उभ्या असलेल्या व्यक्तीचा आवाज शिवानीच्या कानावर आला.. " आत येणार आहात की रात्र बाहेर पावसातच काढायचा विचार आहे "

शिवानी गोड हसली. एवढ्या संकटाला समोर गेल्यावर निदान काहीवेळ तरी तिच्या चेहऱ्यावर हसू होतं. तिने आत वाड्यात प्रवेश केला. ती आत जाताच वाड्याच दार कर्णकर्कश आवाज करत बंद झालं, जसं काही आता ते पुन्हा कधीच उघडणार नाही या उद्देशाने.. या आवाजाने शिवानी थोडी घाबरली खरी..

वाड्याचा दरवाजा बंद झाला, बाहेर काळोख्या अंधारात वाड्याच्या तोंडावर एक छद्मी हास्य मात्र जरूर पसरलं होतं, समाधानाचं... आता खरं वाडा सज्ज झाला होता आपलं खरं भयानक रूप दाखवण्यासाठी. वाडा आणि त्या वाड्यातील माणसं पुन्हा एकदा यशस्वी झाली होती, एका निष्पाप जीवाला फ़सवण्यात...

पाऊस चालूच होता बाहेर, रप रप आवाज करत. कधी नव्हे तो एवढा बरसत होता. की त्याच्याही मनात होतं अजून एक निष्पाप बळी नको, म्हणून तर तो नसेल ना सांगत बेभान बरसून त्या आभाळातल्या परमेश्वराला.

वाडा एका घनदाट जंगलात होता त्यामुळे साहजिकच तिथे लाईट असण्याचा प्रश्नच नव्हता. हे शिवानीने आधीच जाणलं होतं. वाडा तसा आतून व्यवस्थित डागडुजी केलेला होता. तिने वाड्यात प्रवेश केला, मिणमिणत्या दिव्याच्या उजेडात ज्या व्यक्तीने दार उघडलं होतं, ती

व्यक्ती निदर्शनास आली. गोरा गोमटा, पिळदार शरीरयष्टी, उंचा पुरा, देखणा असा मुकुंद तिच्या समोर आला. ती आ वासून त्याच्याकडे बघतच राहिली, एवढा स्मार्ट मुलगा या जंगलात, अशा जीर्ण, जुन्या, पडक्या वाड्यात काय करतोय. हा तर सर्व सोयींनी युक्त अशा आपर्टमेंट मध्ये नाहीतर एका भल्यामोठ्या बंगल्यामध्ये असायला हवा होता. नाहीतर कुठल्या तरी पब मध्ये मैत्रिणींबरोबर पार्टी करत असायला हवा होता.

की हा पण माझ्यासारखाचं वाट चुकलेला आहे. आणि कालांतराने या वाड्यालाच त्याने आपलं घर बनवलं आहे. असं काहीस पण येऊन गेलं शिवानीच्या मनात.

समोरून मुकुंदच्या खोकल्याच्या आवाजाने शिवानी आपल्या विचारतंद्रीतून बाहेर आली.. खरंतर त्याने मुद्दामच खोकल्याचं नाटक केलं होतं.. कारण शिवानी भिजलेल्या ओल्या कपडयातच उभी होती अजून, त्यामुळे मुकुंदला वाटले कदाचित ही नवख्या व्यक्तीसमोर कसं बोलायचं म्हणून गप्प असेल, सुरवात आपणच करावी, नाहीतरी बिचारी थंडीने आजारी पडायची.. पण त्याला काय माहीत हिच्या डोकयात कसले कसले विचार येतात ते...

न राहवून त्यानेच हाथ पुढे केला. हॅलो करण्यासाठी, दोघांनी एकमेकांची ओळख करून घेतली... हॅलो मी शिवानी. कॉलेज स्टुडंन्ट आहे. इथेच जवळच्या शहरात राहते. आई आणि मी दोघीच असतो घरी. रात्री पार्टी होती मैत्रिणीच्या घरी. खूपच उशीर झाला पार्टीमध्ये, म्हणलं हा जवळचा रस्ता लवकर पोहचीन घरी म्हणून या जंगलातल्या रस्त्याने आले. पण या मुसळधार पावसात माझ्या गाडीला अचानक काय झालं समजलं नाही बंद पडली. मग अशा सुनसान रस्त्यात मी एकटी थांबणं उचीत नव्हतं वाटत. त्यामुळे मी निदान पाऊस कमी होईपर्यंत थांबण्यासाठी काही मिळतंय का पहाण्यासाठी इकडं जंगलात शिरले. वाटलं कोणी आदिवासी पाडा वगैरे मिळेल.

आदिवासी पाडा नाही पण हा ' भया... ' पुढचं बोलणार तोच तिने आपली जीभ चावली, कारण ज्या व्यक्तीच्या वाडयात आपण उभे आहोत त्याच्यासमोरच त्याच्या वाड्याला भयानक

वगैरे बोलणं ठीक नाही वाटत त्यामुळे तिने आपली जीभ आवरली. आणि राहिलेलं वाक्य पूर्ण केलं "पाडा नाही पण वाडा जरूर सापडला "

तुमचे खुप खुप आभार. तुम्ही मला आत वाड्यात प्रवेश दिला. तेवढंच मी पावसापासून वाचले.. आणि त्या काळया ____ सा _____.. पुढचं बोलणं तीन टाळलं...

खरंतर तिने मुकुंदला सगळं खरं सांगितलंच नव्हतं, की आपण आई बरोबर भांडण करून रागाने घरातून निघून आलो आहोत ते. पण बिचाऱ्या शिवानीला काय माहित, हे सगळं घडण्यामागे मुकुंदचाच हाथ होता. ती या सर्वांपासून अनभिज्ञ होती. की हे सगळं जाळं मुकुंदनेच पसरलेलं आहे.

शिवानीने जेव्हा शेक हँड करायला हाथ पुढे घेतला, तेंव्हा मुकुंद चा हाथ तिला खूप गार वाटला, जसं की तिने हातात बर्फ पकडला आहे. तिने झटकन आपला हात मागे घेतला. तिला समजलंच नाही काय होतंय आपल्याबरोबर.

तिने इकडेतिकडे बघितले, मघाशी ज्या बाईचा आवाज आला ती कुठे दिसतच नव्हती, अशी अचानक कुठे गायब झाली, हा विचार ती करत असतानाच मागून तिच्या खांद्यावर पुन्हा एकदा बिलकूल थंड असा स्पर्श झाला, ती खूप घाबरली दचकून तिने मागे वळून बघितले तर, एक स्त्री.... कॉटन ची पिवळसर सफेद साडी नेसलेली, केसांचा आंबेडा, डोळे खोल आत गेलेले, जस की खूप दिवसापासून झोपल्याच नसतील. अशा त्या समोर आल्या, चहाचा कप हातात घेऊन....

तेवढ्यात मुकुंद पुढे आला परिस्थिती सावरत म्हणाला, तुम्ही भिजला होता ना म्हणून आई तुमच्यासाठी चहा बनवायला गेली होती, ही माझी आई....

ती खूप आजारी असते, डॉक्टरांनी सांगितलं, यांना शहरातील हवामान सूट करत नाही, तुम्ही काही दिवस यांना फ्रेश हवेत घेऊन जा.. मग म्हणलं अनायासे सुट्टी आहेच तर घेऊन जावं आईला गावाकडच्या वाड्यात. तसे आम्ही मूळचे शहरातील रहिवासी, पण बाबांना खूप ओढ गावाकडची... मग एका मित्राच्या मदतीने गावी जागा घेऊन बांधला वाडा.. सुट्टीचे काही दिवस निसर्गाच्या सानिध्यात घालवता यावेत म्हणून...

आता बाबा नाहीत. मी आणि आई दोघेचं... अगदी तुमच्यासारखंच, जसं तुम्ही आणि तुमची आई दोघीजणी तसंच मी आणि माझी आई, आम्ही दोघेचं.

खरंतर महिना झाला इथे येऊन आम्हाला, दोन दिवसातच निघणार होतो आम्ही पण पाऊस काही जाऊन देईना. थांबायचं नावच घेईना, नुसता कोसळतोय मुसळधार, जसं की कोणाचा जीव घ्यायला उठला आहे. असं मुकुंदने बोलताच, शिवानीने झटकन मुकुंदकडे पाहिलं, तिच्या नजरेत भीतीचे भाव होते. पावसाच्या गडबडीत आणि त्या काळया सावलीच्या भितीमुळे आईने शिकवलेली एक गोष्ट मात्र ती विसरलीच होती की अनोळखी व्यक्तींवर असा लगेच विश्वास ठेवायचा नाही. विश्वासाचं जाऊद्या ती तर अनोळखी व्यक्तींच्या त्या भयानक वाड्यात उभी होती आणि त्यात मुकुंदचं असलं बोलणं, त्यात भरीस भर म्हणजे या दोन्ही मायलेकरांचे बर्फासारखे थंड हाथ, या सर्व गोष्टींमुळे शिवानीला दरदरून घाम फुटला होता.

चला, आम्ही इथून गेलो नाही ते बर झालं नाहीतर तुम्ही या घनदाट जंगलात एकटीने काय केलं असतं. कारण, आम्ही नसतो तर हा वाडा बंद असता. उघडणार कोणी नसतं त्यामुळे तुम्हाला अख्खी रात्र पावसात उभं राहवून काढावी लागली असती. वरूनवरून जरी मुकुंद हे सगळं काळजीने बोलत असला तरी, त्याच्या मनात काहितरी दुसरंच चालू होतं. असं की ज्याची शिवानीला साधी कल्पनाही नव्हती, की पुढे तिच्याबरोबर काय अघटित होणार आहे.

तेवढ्यात शिवानी म्हणाली, हो तुम्ही इथं होतात म्हणून नाहीतर देव जाणें आज काय झालं असतं माझ्याबरोबर, आणि ती बाहेर काळी सावली... पुन्हा एकदा तिच्या तोंडून काळया सावलीविषयी बाहेर पडलं पण पुढे ती जास्त काही बोलली नाही, गप्प झाली.. कारण या बाबतीत मुकुंदला किंवा त्याच्या आईला सांगणें शिवानीला तात्पुरते तरी ठीक वाटत नव्हते. वेळ आल्यावर नक्की सांगू या दोघांना आपलं इथं येण्यामागचं कारण काय, काय असं झालं ज्यामुळे आपल्याला इथंवर यावं लागलं.

शिवानीचे बोलणे ऐकून मुकुंदचे काळे पांढरट डोळे अंधारात चमकले.. त्या काळया सावलीची तर कमाल आहे ही, म्हणून तर तू फसली आहेस आमच्या जाळयात... मुकुंद असं म्हणत मनोमनी हसला. कारण त्यांना त्यांचं सावज अगदी थोडयाशा प्रयत्नाने मिळालं होतं. ते दोघे तिच्याबरोबर आता काहीही करू शकत होते. कारण वाड्याचा दरवाजा उघडला होता तो या दोघांच्या मर्जीने आणि बंदही या दोघांच्याच मर्जीने. एकदा कोणी या मायलेकरांच्या तावडीत सापडलं की पुन्हा त्याचा आत्मा देखील वाड्याबाहेर जाणं अवघड होतं.

मुकुंदच्या आईने दिलेला चहा, शिवानी खाली बघून संपवत होती आणि हे दोघे एकमेकांकडे बघुन असुरी हसत होते आपले सुळे दात बाहेर काढत.....

# 2

बाहेर पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे शिवानी पूर्णपणे ओलेचिंब झाली होती, कारण ती त्या बेभान बरसणाऱ्या पावसातूनच धावत पळत वाड्यापर्यंत आली होती. मुकुंद बरोबर बोलणं जरी झालं असलं तरी अजून त्याने तीला कपडे वगैरे भिजलेत याबद्दल तिला काही विचारलंच नव्हतं त्यामुळे ती तशीच ओल्या कपड्यात कुडकुडत बसली होती, मुकुंदने ते पाहिलं, त्याने ओळखलं शिवानीचे पूर्ण कपडे तर ओलेचिंब झालेत, कशाचाही विचार न करता पटकन त्याने तिला वरच्या खोलीत जाऊन ओले कपडे बदलायला सांगितले.

शिवानी स्तब्ध झाली, म्हणजे तिलाही थंडी लागतच होती आणि कपडे बदलण्याची खूप आवश्यकताही होती पण तिचं मन शांत बसणाऱ्यातलं थोडीच होतं. लगेच तिच्या मनात विचार आलाचं, इथे तर हे दोघेच आहेत. एक बॉडीबिल्डर तरुण आणि एक माझ्यापेक्षा दुप्पट वयाची बाई, मग इथे यांच्याजवळ माझ्या मापाचे कपडे कुठून आले.

माझ्या मनात ना उगाच भलते सलते विचार सारखे येतात, वेळ काय, मी विचार काय करतेय. असेल याची कोणी मैत्रीण वगैरे, येत असेल हा मुकुंद आपल्या मैत्रिणींना इकडे घेऊन, तसंही एवढा हँडसम, डॅशिंग आहे हा. एक दोघी तर नक्कीच पटवल्या असतील ह्याने, तेव्हाच म्हणला ना, वरती रूम मध्ये तुझ्या मापाचे कपडे आहेत. बदलून ये, अशी ओल्या कपड्यात बसू नको..

मरु दे ! मला काय करायचं, कशीतरी रात्र काढायची या भयानक वाड्यात आणि सकाळी निघायचं इथून या जंगलातून, तसंही मला खुप वैताग आला आहे या सगळयाचा. नुसता

पाऊस-पाऊस कोसळतोय जिकडे तिकडे, सगळीकडे नुसता चिखल, हा भयानक वाडा आणि त्यात ती काळी अदृश्य सावली, जी पाठलाग करतेय माझा. कधी एकदाची बाहेर पडतेय यातून असं झालंय मला. उद्या सकाळी उजाडल्या उजाडल्या बाहेर पडणार मी इथून, बिल्कूल देखील थांबणार नाही मी इथं या असल्या रहस्यमयी वाडयात. आणि बाहेर पडल्यावर तडक मम्माला भेटणार आणि सॉरी म्हणणार.. कारण सगळी चुकी माझी होती, मम्मा बरोबर भांडणाची सुरवात देखील मीच केली होती, आणि तिच्यावर रागावून मीच बाहेर पडले, मूर्खासारखं.. ती नको म्हणत असताना, एवढं समजावत होती ती आपल्याला.. बाळा ! नको जाऊ बाहेर अशा वातावरणात, खूप पाऊस पडतोय.

तरी आपण ऐकलं नाही तिचं, अडकलो ना मग संकटात. म्हणून मोठ्यांच सांगितलेलं ऐकायचं असतं, नाहितर असं होतं. शिवानी स्वतःलाच दोष देत होती कारण तिने तिच्या आईचं ऐकलं असतं तर ती एवढ्या मोठ्या संकटात नसती सापडली.

मुकुंदने तिला खुप काळजीने सांगितलं होतं, ओले कपडे बदलण्यास. जरी त्याने तिला एवढं काळजीपूर्वक सांगितलं असलं तरी शिवानी या सगळया गोष्टीपासून अनभिज्ञ होती की त्याच्या या प्रेमळ बोलण्यामागे खूप मोठं आसुरी कारस्थान शिजत आहे.

*********

तिकडे शिवानी ची मम्मा खूप काळजीत होती, एकुलती एक तिची लेक, तिच्यावर अशी रागावून कुठे निघून गेली होती, कोणास ठाऊक...

सारं काही केलं, पोलिसांत तक्रार केली. पाहुण्यांना, मित्र-मैत्रिणींना, ट्युशन, डान्स कलासेस, सगळीकडे विचारून झालं. शिवानीचा कुठेच काही पत्ता लागत नव्हता. तिचा फोनही कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर लागत होता, तिच्या मम्माला समजेना काय करावं, कुठे शोधावं आपल्या

मुलीला... विचार करून करून वेडं व्हायची वेळ आली होती शिवानीच्या आईची. राहून राहून तिच्या मनात हेच येत होतं, काही वाईट तर झालं नसेल ना माझ्या पोरीबरोबर. धीर द्यायलाही कोण नव्हतं बिचारीजवळ. इकडे ती एकटी आई लेकीच्या काळजीत आणि तिकडे तिची लेक संकटात, आसुरी कैदेत.

*************

इकडे शिवानी दुसरी कपडे घालून खाली आली.. पण जी कपडे तिने घातली होती. मळकटलेली आणि कुजकट, घाणेरडा वास येणारी होती. तरीही नाईलाज थंडीपासून वाचण्यासाठी तिला हे करणं भागच होतं..

राहून राहून तिच्या मनात येत होतं, ही अशी घाणेरडी कपडे कशी काय आली असतील. तीही एवढी सगळी.

त्यात मुलांचे शर्ट, पॅन्ट, साडी, ड्रेस खूप प्रकारचे कपडे होते. तिच्या मनात होतं पण तिने याविषयी मुकुंदला विचारणं टाळलं....

खाली येऊन बघते तर मुकुंदच्या आईनी जेवणाचं ताट आणलं होतं तिच्यासाठी. तिने या दोघांना विचारलं देखील तुम्ही नाही का जेवणार या दोघांनी नाकारार्थी माना हलवल्या. तिला बिचारीला काय माहीत यांना जेवण नाही तर.... मनुष्याचं ताज गरम रक्त आणि मांस खाल्याशिवाय झोप नाही लागत...

ती बिचारी शिवानी, पळून पळून दमलेली, थकलेली असल्यामुळे पोटाला सपाटून भूकही लागली होती. यांनी एवढ्या लगेच स्वयंपाक कसा बनवला हा देखील विचार करण्याची तिची क्षमता नव्हती. भुकेपुढे मेंदु काम करणं बंद झाला होता.

घरी असल्यावर हेच का बनवलं म्हणून नाक मुरडत जेवणारी, ही भाजी नाही आवडत मला तुला संगीतलं ना नको बनवत जाऊ, असं आईला म्हणणारी शिवानी जास्त आढेवेढे ना घेता मुकुंदच्या आईने आणलेलं ताट स्वतःच्या हातात घेतलं आणि तिथेच सोफ्यावर बसली. ताटात भात आणि वाटीत काहीतरी रस्स्यासारखं होतं. तिने त्यात हाथ बुडवताच... काहीतरी गिळगिळीत, किळसवाण तिच्या हाताला लागल.... ते जे काही होतं ते रक्तासारखं लालभडक होतं. हे सगळं बघून होती नव्हती तेवढी सगळी भुक अगदी पळून गेली तिची.

शिवानी आतून हादरली हे काय आहे, तिने लगेच भापलं... इथे नक्कीच काहीतरी भयंकर आहे.. पण ते माझ्या डोळ्यांना दिसत नाही. माझ्यापासून लपवलं जातंय.. कधी न घाबरणारी शिवानी, आता या वेळेला खुप घाबरली होती.

कारण तिच्याबरोबर कोणी नव्हतं, ती एकटी सापडली होती या नरभक्षक पिशाच्यांच्या जाळ्यात... तिला काहीही करून यातून बाहेर निघणं भागच होतं, नाहीतर ती जीवानिशी जाणार होती... तिने हळूच एका डोळ्याने त्या दोघांकडे बघितलं.. ते दोघेजण हिच्याकडेच बघत होते, आशाळभूत नजरेने, की केव्हा एकदा ही पोरगी त्यांच्या जाळ्यात फसतेय आणि केव्हा एकदा मनुष्य देहाचा स्वाद चाखायला मिळतोय. कारण खूप दिवस झाले ते दोघेही उपाशी होते. भुकेलेले होते नर मांसाचे.

पण त्यांना काय माहीत, ही जी समोर बसलेली आहे ती त्यांच्यापेक्षा हुशार आहे. तिने लगेच जाणलं जे काही पाणी मुरत आहे ते इथेच या दोघांजवळ. शिवानी अचानक ऊठून उभी राहिली आणि बोलली, माझं जेवून झालं आहे, तसंही मला भूक अशी नव्हतीच, खूप थकलेय मी, मला विश्रांतीची गरज आहे....

तेवढ्यात मुकुंदची आई उठली, शिवानीच्या हातातून तिचं ताट घ्यायला, पण शिवानीने चपळाई करत ताट स्वतःच्याच हातात ठेवलं आणि बोलली.. राहुद्या आई मी ठेवते ना ताट आत स्वयंपाक घरात, आणि या दोघांना कळायच्या आत ती स्वयंपाक घरात गेली सुदधा.. कारण तिला या सगळ्या गोष्टीचा छडा लावायचा होता, की जेवण म्हणून मुकुंदच्या आईने तिला ताटात काय वाढलं होतं. नक्की काय करस्थान चालू आहे माझ्याविरुद्ध या दोघांचं. म्हणून तिने ठरवलं स्वयंपाक खोलीतच जाऊन बघावं लागणार, या माय लेकराचं नक्की काय चालू आहे.

शिवानी स्वयंपाक खोलीत गेली. तिने तिथे जे बघितलं, ते ती स्वप्नात सुदधा केव्हा विचार करू शकणार नाही एवढं भयंकर होतं....

ते समोरचं दृश्य बघून तिच्या पोटातून होत नव्हत ते उचंबळून बाहेर आलं. स्वयंपाक घर थोडीच होतं ते, कसाई-खाना होता तो, त्यापेक्षाही भयंकर...

सगळीकडे लाकडाचे ओंडके, त्यावर मोठं मोठे धारदार कोयते..... जिथं तिथं रक्ताची थारोळी, मांसाचे छोटे छोटे तुकडे जिकडे तिकडे पसरलेले. शिवानीला स्वतःवर विश्वासच बसेना की ती जे हे बघतेय ते सर्व खरं आहे. पण ते मांसाचे तुकडे नक्की कशाचे ? हे कोडं तिला अजून उलगडलं नव्हतं.. ते रक्त कशाचं, आणि मला जे जेवण म्हणून द्यायचा प्रयत्न केला ते काय होतं.

कितीही शांत रहायचा प्रयत्न केला तरी विचार करून करून आणि समोर ते अमानवी दृश्य बघून तिच्या तोंडून एक जोराची किंकाळी बाहेर पडली...

बाहेर बसलेले ते दोन भक्षक समजून गेले, आपला डाव आता फसलेला आहे. जे काही करायचं ते लवकर करायला हवं, नाहीतर हातात आलेलं सावज निसटून जायचं.

दोघेही उठुन उभे राहिले. मुकुंद त्याच्या आईला जोरात ओरडला तुला काय गरज होती, तिच्या हातात ताट द्यायची. बघ, कळलं ना आता तिला सगळं.. चल आता लवकर चल ! नाहींतर ती निघून जाईल. आपलं आयतं हाती आलेलं घबाड आपल्या हातून निसटेल.

शिवानीने जाणलं की तिने किंचाळून चूक केली आहे. आता त्या दोघांना कळणार. आता आपली खैर नाही., तिने तसाच हाथ आपल्या तोंडावर ठेवला आणि लपायला जागा शोधू लागली. त्या खोलीत जिथे शिवानी होती तिथे सगळीकडे अंधारच अंधार पसरला होता, थोडासा कुठूनतरी चंद्राच्या छोट्याशा कवडशाचा उजेड आत येत होता. त्या मिणमिणत्या प्रकाशात धडपडत ती लपायला जागा शोधू लागली. तिथे खूप सारे लाकडाचे ओंडके होते. त्यातला एक मोठा ओंडका शोधून ती त्याच्यामागे लपली, जेणे करून निदान थोड्या वेळेपूरतं तरी ती या दोघापासून लपून राहील आणि पुढचा मार्ग कसा शोधायचा याचा विचार करेल.

पण शिवानीसाठी हे सगळं घडणं खूप अनपेक्षित होतं. असं सगळं आपल्यासोबत घडू शकतं याचा पुसटसा देखील विचार केला नसेलं त्या बिचारीने, जेव्हा आईबरोबर भांडून घरातून बाहेर पडली होती. तिच्या समोर जे घडत होतं ते खूप किळसवाण होतं. सगळीकडे रक्तच रक्त, नजर जाईल तिकडे फक्त मांसाचे तुकडे बाकी काही नाही.

# 3

खूप किळसवाण होतं ते सगळं. सगळीकडे रक्तच रक्त. घरात साधं खरचटलं तरी आरडाओरडा करणारी ती आज मात्र रक्ताच्या थारोळयात होती.. एक प्रकारचा उग्र वास होता तिथं, श्वास घेणंही मुश्किल होतं. अशा परिस्थितीत सापडली होती शिवानी... डोळयातुन अश्रूंच्या धारा लागल्या होत्या, आईच्या आठवणीने.. केव्हा सुदधा ती आपल्या आईला सोडुन राहिली नव्हती.. वडिलांचं प्रेम काय असतं ते माहीतच नव्हतं.. शिवानीचे वडील ती लहान असतानाच तिला आणि तिच्या आईला सोडुन कुठे निघून गेले कोणालाच माहीत नाही खूप शोधलं पण कुठे नाही सापडले.. एकट्या आईने हिमतीने सांभाळल होतं तिला. आज तीच शिवानी मृत्यूच्या दारात उभी होती, आणी त्या बिचाऱ्या आईला याची कल्पना देखील नव्हती.

*****************

तिकडे तिच्या आईचा जीव तरी थोडाच राहणार होता, दिवस निघून गेला, रात्र संपत आली. अजून आपली लेक घरी आली नाही. खूप काळजीत होती तिची मम्मा...

शेवटी न राहून शिवानी ची आई स्वतः बाहेर पडली अशा अपरात्री आपल्या मुलीला शोधायला. कपाटातील सरकारी परवाना असलेली छोटी बंदुक बाहेर काढली, गरज भासलीच तर म्हणून, दोघीही मार्शल आर्ट ट्रेनी होत्या घरात गन वगैरे असनं सहाजीकच होतं. गॅरेज मध्ये पार्क केलेली गाडी बाहेर काढली आणि निघाली भरधाव वेगाने.. शोधात आपल्या लेकीच्या,

कारण शिवानी कितीही तिच्या आईबरोबर भांडली, कितीही वेड्यासारखं वागली तरी ती तिची आई होती, जास्त वेळ आपल्या मुलीपासून लांब राहू शकणार नव्हती. शेवटी त्या दोघीच तर होत्या एकमेकींना आधार. तिच्या काळजीपोटी तिची आई कसलाही विचार न करता एकटी निघाली होती आपल्या लाडक्या लेकिच्या शोधात....

******************

इकडे वाड्यात पाशवी, अमानवी, निर्दयी खेळ चालू झाला होता. मुकुंद आणि त्याची आई आपलं सोज्ज्वळ रूप बदलून खऱ्या रुपात आले होते कारण आता नाटकाचा पर्दाफाश झाला होता. शिवानीला सर्व काही समजले होते.

हा..... हूं.... हा...... हूं आवाज करत दोघे आपल्या अक्राळ विक्राळ रुपात आले.. लाल भडक डोळे, डोळयातून भळाभळा रक्त वाहत होतं, अंगाच्या चिंधड्या चिंधड्या उडालेल्या, हाताची नखं एवढी मोठी की ज्याने नरमांस अगदी सहज फाडून खाता येईल.

ती दोन्ही पिशाच्च, धाप - धाप पायाचा आवाज करत चालत येत होती जिकडे शिवानी लपली होती. त्या दोन्ही पिशाच्याना माहीत होतं की आता शिवानी त्यांच्या जाळयात फसली आहे, आणि ती इथून कितीही प्रयत्न केला तरी बाहेर पडू शकणार नाही. त्यामुळे ते दोघेही निश्चित

होते, कारण ती कुठेही लपून राहिली तरी यांच्या हातून वाचू शकणार नव्हती, आज ती यांच भक्ष बनणार हे अटळ होतं.

शिवानी कोपऱ्यात एका मोठ्या ओंडक्या मागे लपली होती, जेणेकरून त्या दोघांना ती सहजासहजी नजरेस पडू नये. पण मघाशी तिच्या तोंडून निघालेल्या किंकाळीमुळे ती पूरती फसली होती. त्यामुळे जरी ती लपली असली तरी अजूनही तिने आपला हाथ तोंडावरून काढला नव्हता, कारण तिला आता कुठचाही आवाज करून चालणार नव्हतं. नाहीतर ती जीवानिशी जाणार होती.

त्या दोन्ही पिशाच्यानी जिथे शिवानी लपली होती तिथे प्रवेश केला, म्हणजे जे तथाकथित स्वयंपाक घर होतं तिथे. जस जसे ते दोघे पुढे येत होते तस तसे अजून भयानक दिसत होते, शिवानीने त्यांना बघितलं नि तिची बोबडीच वळली. आजच्या जमान्यात हे असं काही पण असू शकत याच्यावर तिचा विश्वासच बसत नव्हता. कॉलेज, जीम, कराटे, गाणी, मित्र-मैत्रिणी, मौज-मज्जा, याशिवाय दुसरं कुठलं तीच जग नव्हतंच. मग हे भूत पिशाच्च वगैरे सगळं तिच्या आकलनशक्ती पलीकडचं होतं.

दोघेही तिला आवाज देऊ लागले, शिवानी... ए बाळ शिवानी ! ये बरं बाहेर, बघ आम्ही आलोय. तुला न्यायला.. मग आम्ही तुला पकडणार... तुला या ओंडक्यावर झोपवणार... मग पहिलं तुझा गोड गोड गळा आहे ना तो कापणार.. मग त्यातून निघालेल गरम गरम लाल रक्त पिणार... मग तुझे छोटे छोटे तुकडे करणार या कोयत्याने.. मग तुला खाणार.. मग शिवानी

मरणार... मरणार.. होय ना रे मुकुंद.. हाहा... हाहा... हह.... हह.... हाहा.. असं ती पिशाच्चीणी, मुकुंदची आई म्हणाली आणि ते दोघेही जोरजोरात हसायला लागले..

शिवानी पुरती घाबरली होती, हे सगळं एकूण ती जणू काही मेल्यात जमा झाली होती, श्वास काय तो चालू होता फक्त तिचा..

ते दोघेजण अजून जवळ येत होते शिवानीच्या. खरंतर अजून त्या दोघांना ती नक्की कुठे लपलेय हे माहित नव्हतं. पण, ती या दोघांना बघू शकत होती. त्यांच ते अक्राळ विक्राळ रूप बघून ती पुरती हादरली होती. भीतीने कापायला लागली होती ती, तिच्या शरीरातून सगळे त्राणच जसं काही संपले होते. शरीर जरी साथ देत नसलं तरी तिचं मन मात्र मानत नव्हतं काहीही करून इथून बाहेर पडायचं हेच येत होतं तिच्या मनात. त्यामुळे त्या दोन्ही पिशाच्याच्या नकळत ती हळू हळू मागे सरकत होती.. अचानक तिला समजलंच नाही काय झालं आणि ती धापदिशी कुठेतरी पडली. कशावरतरी जोरात आपटली.

*****************

शिवानी नकळतपणे जिथे अचानक पडली ते तळघर त्या वाड्याच तळघर होतं... ती ज्या मोठ्या ओंडक्याच्या मागे लपली होती त्यालाच लागून एक छोटा ओंडका होता, आणि शिवानी जशी मागे सरकली तस ते लाकूड, तो छोटा ओंडका बाजूला झाला नि, तळघरात जायच्या गुप्त रस्त्याद्वारे ती खाली पडली. खाली जोरात आपटल्यामुळे थोडसं लागलं देखील तिच्या कमरेला, पण जीवानिशी मरण्यापेक्षा हे असं पडून लागलं तरी बेहत्तर असं म्हणून तिने वेळ टाळली.

तिने त्या पिशाच्च्यापासून निदान तात्पुरता तरी जीव वाचवला असला तरी आता तिला समजत नव्हतं नक्की आपण कुठे आलो आहोत. असं अचानक कुठे धडपडलो आपण, कुठे पडलो.

तेवढ्यात तिच्या मनात विचार आला, जरी आपण तात्पुरतं त्या दोघापासून वाचलो असलो तरी ते दोघे इथेही येणार, आणि आपला जीव घेणार. आता अजून काहीतरी आपल्याला मार्ग शोधलाच पाहिजे. जर ह्या दोन्ही अमानवी शक्तींपासून जीव वाचवायचा असेल तर.

*****************************

इकडे शिवानी ची आई, गाडीत चालवत चालवत एकच विचार करत होती, कुठे गेली असेल माझी लाडकी. असं एवढं कोणी रागवतं का आपल्या आईवर.... शिवानीच्या आठवणीने तिची आई अगदी व्याकूळ झाली होती. मन बिल्कुल थाऱ्यावर नव्हतं तिचं.

हा सगळा विचार करत असतानाच, अचानक तिच्या आईला आठवलं, मागच्या वेळी जेव्हा ती रागावली होती, तेव्हाही शिवानी असंच घर सोडून निघून गेली होती. तेव्हाही शिवानीच्या आईने खूप वेळ शिवानीची वाट बघितली तरी शिवानी घरी परत आली नव्हती, तेव्हाही शिवानीची आई अशीच घाबरली होती. आणि अशीच शोधाशोध करत असताना तिला कोणाचातरी फोन आला होता आणि त्यांनीच ही खबर सांगितली होती की त्यांनी शिवानीला एकटीला जंगलात गाडीबरोबर बघितलं आहे.

हे कळताच क्षणाचा विलंबही न लावता शिवानीची आई स्वतःची गाडी घेऊन, सरळ जंगलाच्या दिशेने गेली होती कारण कसंही करून शिवानीला लवकर शोधन गरजेचं होतं. जंगलात थोडं पुढे जाताच तिच्या आईला तिथे एक गाडी उभी दिसली. तिच्या आईने लगेच

ओळखलं की ही गाडी शिवानीचीच आहे. आई गाडीतून खाली उतरून बघते तर ही शहाणी पोरगी तिथे एकटीच बसली होती वेड्यासारखी रडत..

तिथले वनाधिकारी शिवानीच्या आईच्या ओळखीचे होते, त्या वनाधिकाऱ्यांना, गाई चारायला घेऊन आलेल्या एका गुराख्यानं सांगितल की, एक मुलगी जंगलात एकटीच रडत बसलेय. चांगल्या घरातली वाटतेय. विचारपूस केली तरी काहीच बोलेना. मग हे वनाधिकारी स्वतः गेले तिथे बघायला की कोण आहे मुलगी, का अशी जंगलात आलेय एकटी. शिवानीला बघताच त्यांनी शिवानीला ओळखलं आणि शिवानीच्या आईला फोन केला होता. तेव्हा जाऊन कुठे शिवानी सापडली होती.

"आताही तिकडेच नसेल का गेली ही जंगलात ". हे मनात येताच शिवानीच्या आईने पुन्हा एकदा जंगलाच्या दिशेने गाडी वळवली. कारण तिला माहीत होतं. मागच्यावेळीही शिवानी जंगलातच गेली होती रागावून, आताही सगळीकडे शोधलं कुठेही सापडली नाही. मग शेवटचाच पर्याय उरतो, जिथे अजून शिवानीला आपण शोधलं नाही ते म्हणजे जंगल, कारण मागच्यावेळीही शिवानी तिथेच सापडली होती.

जंगलाचा विचार मनात येताच काळजात धस्स झालं शिवानीच्या आईच्या, कारणही तसंच होतं. त्या वनाधिकाऱ्यांनी आणि त्या गुराख्यानं जे सांगितलं होतं, ते काळीज चिरणार होतं. तेव्हा शिवानीला गाडीत बसवलं असल्यामुळे शिवानीला याबद्दल काहीच माहीत नव्हतं, आणि तिच्यापुढे सांगणंही उचित ठरलं नसतं म्हणून त्या वन अधिकार्यांनी तिला गाडीत

बसवल्यावरच तिच्या आईला सांगितलं, हे पहा मॅडम ! सगळयाच जागा सारख्याच असतील असं नाही. काही चांगल्या काही वाईटही असतात. त्यांना दुजोरा देत गुराखी पण हुंकारला, हो हो ताई साहेब.

शिवानी ची आई म्हणाली मी समजले नाही तुम्हाला काय म्हणायचंय...

वन अधिकारी म्हणले जंगलात येताना, पाटी दिसली नाही का तुम्हाला? त्यावर काय लिहिले होते..

दिवस मावळल्यानंतर जंगलात कोणीही थांबू नये, प्रवेश करू नये. हिंस्र प्राणी हल्ला करण्याची शक्यता आहे.

मीही संध्याकाळ व्हायच्या आत इथून निघतो, जास्त पावसाळयात तर इथे फिरकतही नाही. तेवढ्यात गुराखी बोलला, "ताई साहेब, रातच इंदारच हित कुणिबी यत न्हाय ".. आणि आलंच तर मागारी जीत्त जात न्हाय.. लय वाईट शक्ती हाय बघा हित, पुरगिला हितनं फूड, हिथ यवून दिवू नगा, न्हायतर लय अवघड हुन बसल... हा सगळा प्रसंग शिवानीच्या आईच्या डोळयापुढे उभा राहिला.. (खरंतर सावज तेव्हाच टिपलं होतं फक्त वेळ आली नव्हती, त्या दुष्ट शक्तींन डाव तेव्हाच खेळला होता फक्त हे समजलं मात्र कोणाला नव्हतं ).. तेव्हापासून शिवानी खूप हट्टी झाली होती, सारख कशाना कशा वरून ती आई बरोबर भांडायची, निघून जायची धमकी द्यायची पण तिच्या आईने याकडे जास्त लक्ष दिले नाही, हे वयच असतं असं वागायचं म्हणून विषय सोडून दिला.

हे सगळं आठवत असतानाच जोराचा ब्रेक मारला शिवानीच्या आईने आपल्या गाडीला.. समोर व्हाईट रंगाची, आताच दोन महिन्यांमागे शिवानीला गिफ्ट केलेली कार, बंद पडलेल्या अवस्थेत दिसली. शिवानीची आई गाडीतुन खाली उतरली, आणि बंद पडलेल्या शिवानीच्या गाडीजवळ गेली. गाडीची खूप वाईट अवस्था झाली होती. संपूर्ण गाडी चिखलाने माखली होती.

हेड लाइट बंद पडल्या होत्या, गाडीच्या इंजिन मधून धूर निघत होता.. अजून गाडी गरम होती, याचा अर्थ खूप वेळ झाला नव्हता शिवानीला गाडीतुन उतरून, म्हणजे ती इथेच कुठेतरी असणार..

बघु कुठे सापडतेय का, हा विचार करत तिची आई चालू पावसात रस्तावरून खाली उतरली नि शिवानीच्या शोधात निघाली त्या जंगलात, चिखलातून तिला हाका मारत.. पण तिला शिवानी कुठेच सापडली नाही.... थोडं पुढं गेल्यावर तुटलेली चप्पल दिसली, हातात उचलून पाहिल्यावर ती शिवानीचीच होती हे आईने ओळखले. ती मटकन खाली बसली, हमसून हमसून रडू लागली. जीव की प्राण होती तिची लेक तिच्या साठी, तीला ती अशी गमवू शकणार नव्हती, तिच्याशिवाय त्या आईला होतंच कोण ?

जर शिवानीला सुखरूप परत आणायचं असेल तर असं हाथ पाय गाळून बसून चालणार नाही.. मलाच खंबीर व्हायला पाहिजे, असं म्हणत शिवानी ची आई तडक उठली नि पुढे आजून काय पुरावा मिळतो का पाहूं लागली, थोड्याच अंतरावर तिला काहीतरी चमकताना दिसलं, ते कव्हर होतं शिवानीच्या मोबाईल फोन च.. पण शिवानी कुठेच दिसत नव्हती, ना आवाज देत होती.

तिच्या आईला कळून चुकलं की हे प्रकरण दिसतंय तस सोपं नाही. आपल्याला आपली सर्व शक्ती पणाला लावावी लागणार आहे आपल्या मुलीला परत आणण्यासाठी.. ती तडक मागे फिरली. गाडी स्टार्ट करून जंगलापलीकडे जे गाव होतं तिथे जायला निघाली..

********************

# 4

इकडे वाड्यात या दोन पिशाच्यांचा आकांडतांडव चालूच होता, कारण अचानक शिवानी कुठेतरी गायब झाली होती, आणि ती कुठे गेली हे या पिशाच्यांच्या लक्षातच आलं नाही. आणि जिथे शिवानी चुकून पडली तो तळघराचा मार्ग त्या दोन पिशाच्यांनीच काढला होता, अचानक कोणी आलंच इथे तर त्याला समजू नये, आणि आपण पकडू जाण्याच्या आधी इथून खाली तळघरात जावं, म्हणजे जो कोणी आपल्याला केव्हा बघेल वा शोधेल त्याला समजणारच नाही इथल्या इथे गायब व्हावं. खाली तळघरात जावं, जिथं.... जिथं तर आपलं खाद्य ठेवलेलं आहे लपवून .... या जागेबद्दल खरंतर ते दोघेजणही विसरून गेले होते, की शिवानी इथे पडू शकते वा लपू शकते. कारण त्या पिशाच्यांना या गुप्त रस्त्याची केव्हा गरज पडलीच नाही. कोणी एकदा आत वाड्यात चुकून आला की त्याचा शेवटच करून टाकायचे हे दोघे, मग यांना कशाला कोणापासून लपायची गरज लागतेय.

वाड्याची ही बाजू तर शिवानीपासून अजून लपूनच होती. जोरात आवाज करत, धपकन शिवानी त्या बोगद्यासारख्या रस्त्यातून खाली पडली. तिला काही समजलेच नाही, नक्की काय होतंय आपण कुठे पडलो. ती दोन पिशाच्च कुठे गायब झालीत, कशाचाच सुगावा तिला लागत नव्हता.

तिने स्वतःला सावरलं आणि इकडे तिकडे ती हाथ लावून चाचपडून पाहू लागली, की नक्की आपण कुठे आहोंत. काहीतरी ओलसर ओलसर जाणवलं तिच्या हाताला, घट्टसर चिकट द्रव्य होतं ते, तिने लगेच ओळखलं नक्कीच ते रक्त असणार.. वरती तिने थारोळेच्या थारोळे बघितले

होते रक्ताचे... अजून पुढे घसरत घसरत जाऊन बघत होती ती, काहीतरी मार्ग मिळतोय का इथून बाहेर निघण्याचा.. ती धडपडली... कसलीतरी गाठोडी बांधून ठेवल्यासारखं वाटतं होतं.

तिने हाथ लावून बघितलं, नक्की काय आहे त्यात.... तिच्या हाताला जी गोष्ट लागली... पूर्ण अंगाचा थरकाप उडाला तिच्या, तिने कल्पना सुध्दा केली नव्हती असं काही असेल, मनात सुद्धा तिच्या हा विचारआला नाही, की इतकं पुढच्या टोकाचं तिला अनुभवाव लागणार आहे.

जस पिशव्यांत सामान भरावं आणि जागा कमी पडली म्हणून रेचून रेचून कोंबाव, तसं त्यात दुसर तिसरं काही नव्हे तर अर्धी मुर्धी खावून राहिलेलं, माणसांची प्रेतं होती त्यात... जिकडे बघेल तिकडे तेच ते.. कुठे तुटलेला हाथ लागायचा... कुठे पाय... कुठे फक्त धड तेही बिना मुंडक्याच... कुठे कुणाचे केस हातात यायचे डोक्याचे.. खूप किळसवाण होतं ते सगळं...

आता मात्र शिवानीला समजलं होतं. ते वाड्याच्या वरच्या मजल्यावरील खोलीत जे एवढे सगळे कपडे होते ते कुठून आले होते, कोणाचे होते. आणि आता देखील तिच्या अंगात तेच होते. खुप किळसवाण वाटत होतं तिला, हा सगळा प्रकार बघून. आणि स्वतःचा खूप रागही देखील येत होता.

जर मी मम्मा बरोबर अशी भांडून, रागावून आले नसते तर हे सगळं घडलंच नसत माझ्या बरोबर.. तिला आता आपल्या आई ची खुप आठवण येत होती. " मम्मा प्रत्येक वेळी मी चुकल्यावर तू समजावलयंस मला, अडचणीत असल्यावर तू मदत केलीयस मला, आताही तूच वाचव "... मला माहितेय तू येणार आपल्या पिल्यासाठी.... आणि जोरजोरात रडू लागली.. आता काहीवेळाने मी असणार या गठोडयात.. मलाही असंच अर्ध मुर्ध खाऊन भरून ठेवतील या पिशव्यांत पुन्हा खाण्यासाठी....

धीर संपला होता तिचा, बिलकुल हतबल होती ती.. देवच काही करेल, असं मन म्हणत होतं तिचं, ,

तिच्या हुंदक्याचा आवाज.. त्या दोघांपर्यंत केव्हाच पोहचला होता. भीतीमुळे शिवानीला समजलं नाही आपण जोराजोरात रडायला नको होतं. आता खरा खेळ चालू झाला होता. ते दोघेही आपले अवजड पाय धप धप आवाज करत पुढे पुढे शिवनीच्या दिशेने सरकवत होते.. तिला आता हलताही येणार नव्हतं, मार्गच नव्हता कोणता शिल्लक, की ती तिकडे जाईल, लपून बसेल.. अशी कोणती जागाच नव्हती..... नशीब बलवत्तर म्हणून मघाशी ती चुकून इथं तळघरात पडली, पण तरीही काही फायदा नव्हता उलट इथं पडल्यामुळे ती तर जास्त अडकली होती. इथे ती हलचालही करू शकत नव्हती. सुटकेचे सर्व मार्ग संपले होते.

एव्हाना ते दोघे तिच्यापासून काही अंतरावरच होते, मनात तिच्या चालूच होतं, देवा आता तूच काहीतरी कर. मला यातून बाहेर काढ. "मम्मा ये ना गं ", तूझ्या पिल्याला वाचव ना गं. तेवढ्यात तिच्या केसाला जोराचा हिसका बसला, ती विव्हवळली. खुप जोरात.. मुकुंद नी तिचे केस पकडले होते... तो मुकुंद वगेरे कोणी नव्हता, ते पिशाच्च होतं एक, ज्याला नर मांस, आणि ताज रक्ताची आस होती फक्त.. मग समोरची व्यक्ती, लहान मूल असुदेत, म्हातारी व्यक्ती, या शिवानी सारखी तरुण मुलगी.. त्याला काही फरक पडणार नव्हता...

जंगलात कोणी भरकटलं, रस्ता चुकलं की ह्यांची रक्ताची तहान जागी व्हायची, आपोआपच यांना वास लागायचा. मग काळी सावली बनून जायचं आणि त्या व्यक्तिला.. घाबरवत घाबरवत इथपर्यंत आणायचं... मग तेच नाटक चालू.... मुकुंद आणि मुकुंदच्या आईचं.. ती काळी सावली दुसरं, तिसरं कोणी नसून मुकुंदच होता तो, हे शिवानीला आता कळून चुकलं होतं. खसदिशी तिच्या मानेला जोराचा हिसका बसला. ती अचानक बसलेल्या हिसक्यामुळे कळवळली. तिला रडताना पाहून हे दोघेजण अजूनच जोरजोरात हसायला लागले. ती ओरडत

होती, रडत होती जिवाच्या आकांताने.. पण तिथे कोणीच नव्हत तिचं ऐकायला, मेलेली, कुजकी, सडकी प्रेतं... ती तरी काय करणार... त्यांची अवस्था तरी याहून काय वेगळी झाली असेल का..

ते दोघेजण चित्र विचित्र आवाजातओरडत होते... हसत होते.. खूप दिवसांनी आज आपल्याला ताज मांस खायला मिळणार.. ह... ह.. हा... हा.. ह.. ह.. हहा.. हह.. हहा... जोरजोरात आवाज काढून ते दोघे पिशाच्च हसत होते.

शिवानी खूप भेदरलेली होती. या दोघांनी तिला ओढत ओढत तळघरातुन वर आणलं. जिथून ती अचानक खाली तळघरात पडली होती त्याच रस्त्याने.. तिथल्या एका ओंडक्यावर तिचं डोकं ठेवलं.. बधिर झाली होती ती. काही समजत नव्हतं तिला आपल्याबरोबर हे काय होतं आहे... श्वास तेवढा चालू होता अगदी संथ.. काहीवेळाने तोही नसणार होता... त्या पिशाच्चीणीने म्हणजे मुकुंदच्या आईने तिचे केस पकडले होते.. आणि मुकुंद तिकडे पडलेला, कोयता आणण्यासाठी गेला.. रक्त सुकलं होतं त्या कोयत्यावरचं.. पण काहीच वेळांत तो कोयता पुन्हा ओल्या रक्ताने माखणार होता... मुकुंद हा..... हूं...... आवाज करत तिच्याजवळ आला, आणि त्याने कोयता उचलला तिच्या शीर धडापासून वेगळं करण्यासाठी... तिने किलकिल्या डोळ्यांनी बघितलं.. कोयता आता आपल्या मानेवर येऊन पडणार, आणि बस्स.. आता आपला शेवट... तिने डोळे घट्ट मिटून घेतले आणि" आई " म्हणत एकच किंकाळी त्या अमानवी, निर्दयी, पिशच्ची वाड्यात फोडली...

**********************************

आई.... असा आवाज करतच तिला जाग आली. हळूहळू तिने आपले डोळे उघडले... पाहते तर काय, तिला प्रथम विश्वासच बसेना, हे सत्य आहे की स्वप्न ..... नक्की झालं काय.. आपण

इथे कसं.. खरं म्हणजे आपण जिवंत कसं... आपण तर त्या रक्ताच्या थारोळयात, आपली मान, तो कोयता... ते दोघे...

कुठे गेले.. काय झालं.... हा विचार करत ती उठण्याचा प्रयत्न करू लागली.... पण मानेला बसलेला झटका.. जेव्हा तिच्या केसाला धरून ओढत आणलं.. दुखावली होती मान.. पण शाबूत होती, हे महत्वाचं.. तेही तीच नशीब बलवत्तर म्हणून नाहीतर काय वाचते आणि कशाचं काय...

तिची आई तिला म्हंटली.. हलू नको बाळा, आराम कर... खूप त्रास सहन करावा लागला ना माझ्या बबड्या ला.... आईने असं प्रेमाने बोलताच.. शिवानी बिलगली आईला.. आणि रडू लागली... "मम्मा, सॉरी ना गं ! " मला माफ कर पुन्हा कधी कधी मी भांडणार नाही तुझ्याही, ना कधी असं रागाने सोसोडून जाण्याचा मूर्खपणा करणार.. आईच्याही डोळयात पाणी आलं... हो, माझा बेटा... सॉरी वगैरे नको म्हणू... बस पुन्हा कधी असं सोडुन जाणार नाही, असं प्रॉमिस कर..

प्रॉमिस, मम्मा ! असं कधी कधी होणार नाही पुन्हा, कधीच नाही.

तेवढ्यात तिथे उभा असलेला तो गावातील गुराखी, तो बोलला.. मंग, आमचं काम झालं असलं तर आम्ही समदी जाऊ का, ताईसाहेब.. !

शिवानी गांगरली.. आता हे कोण ?

हे तर नाहीत ना मारणार मला ? ती घाबरली आणि जोरात ओरडली.. "आई, मला वाचव !"

बाळा, घाबरू नको... यांनी तर मदत केली मला, तुझ्यापर्यंत पोह्चायची... यांच्यामुळेच मी वाचवू शकले तुला, त्या पिशाच्यांच्या तावडीतून.. यांचे जेवढे आभार मानू तेवढे कमीच आहेत.. यांच्यामुळेच मी माझ्या पोटच्या गोळयाला वाचवू शकले, नाहीतर तुझ्या नसण्यानं माझं काय झालं असतं माझं मलाच माहीत, असं बोलत शिवानीची आई आपले डोळे पुसू लागली..

तो गुराखी म्हणाला, आता रडू नगासा, ताईसाहेब ! देवाच्या कुरपेनं समदं आपल्या मनासारखं झालंय, आणि आता त्या दोन भूतान्निबी त्येंची शिक्षा मिळाल्या, आता कुणाचा बी बळी न्हाय जायचा त्या जंगलात....

तेवढ्यात तिथे उभे असलेले थोर पुरुष, एक अलौकिक तेज होतं त्यांच्या चेहऱ्यावर, ते म्हणाले " स्वामी ओम, स्वामी ओम, श्री गुरुदेव दत्त ! "

आई बोलली बाळा यांना नमस्कार कर, खूप मोठे धार्मिक व्यक्ती आहेत हे, यांच्या सामर्थ्यामुळे त्या पिशाच्याना नष्ट करता आलं.

पण शिवानीच्या चेहऱ्यावर मात्र खूप मोठं प्रश्न चिन्ह होतं, की हे सगळं कसं झालं, मी कशी वाचले, मला आईने कसं सोडवलं त्या नराधमांच्या तावडीतून... आई बोलली थांब बाळ, मी सांगते तुला सर्व, कसं झालं, काय झालं, तुला कसं वाचवलं आम्ही...

# 5

आईने सांगायला सुरुवात केली... तू माझ्यावर रागावून बाहेर निघून गेलीस खरं, पण खूप वेळ झाला तरी तुझा काहीच पत्ता नाही. तुझ्या मित्र मैत्रिणींना विचारून झालं. कॉलेज, डांस क्लास अगदी सगळीकडे चौकशी केली, घरातून निघून गेल्यापासून यांपैकी कोणाशीही तुझा काही संपर्क झाला नव्हता. शेवटी न राहवुन मी पोलीस कंम्प्लेन्ट केली. पण त्यांनी तुझा शोध घेईपर्यंत मला चैन पडणार नव्हता. शेवटी मी विचार केला, म्हणलं आता आपणच निघाव तुझ्या शोधात, मला माहित होतं, तू नक्कीच कुठल्या तरी मोठ्या अडचणीत सापडली असणार.

नाहीतर, माझं पिल्लू, आपल्या मम्मा पासून एवढावेळ लांब राहन शक्यच नाही... मला मागच्यावेळीचा प्रसंग आठवला, जेव्हा तू अजून एकदा माझ्यावर रागावून निघून गेली होतीस... तिकडेच शोधायचं ठरवलं मी तुला. आणि तिकडेच तुझी गाडी उभी असलेली दिसली. माझा संशय खरा ठरला, थोडं आत जंगलात बघितलं, कुठे दिसतेय का तू, तर तुझी तुटलेली चप्पल, मोबाईल फोन दिसला.. पण तू कुठेच दिसत नव्हती..

मला समजलं, तुझ्याबरोबर काय घडलं असणार. असं एकटीने व्यर्थ शोधण्यात काही होणार नव्हतं, कोणाचीतरी मदत घ्यायला हवी होती. हे आठवतायत का तुला, गुराखी आजोबा...... मागच्या वेळीही यांनीच सांगितलं होतं वन विभागाच्या अधिकाऱ्यांना तुझ्याबद्दल..... आणि यांनी हेही सांगितलं होतं. पोरीला पुन्हा इकडं एकटं लावून देऊ नका.. पण मी ही गोष्ट एवढी सिरियसली घेतली नव्हती, त्यामुळे तेव्हा तुला नाही काही बोलले.

तुला वाचवण्यात तेव्हा यांनीच मदत केली होती, आताही करतील या आशेने मी तडक त्या जंगलातून गाडी काढली आणि जंगलापलीकडे यांचं गाव आहे तिथे यांना शोधत गेले... पहिल्यादा तर गावातील माणसं घाबरली... एवढ्या मुसळधार पावसात कोण ही बाई.. कोणाचा पत्ता विचारतेय... कोणी सांगायलाच तयार नाही.. नंतर त्यांना विश्वासात घेऊन घडलेली सगळी हकीकत सांगितलं. मग कुठे त्यांनी ह्या गुराखी बाबांचं घर दाखवलं... तशीच पळत पळत पावसातून मी यांच्या घरी गेले, कारण उशीर करून चालणार नव्हता, तुझ्या जीवन मरणाचा प्रश्न होता..

बाबांना आधी ओळख सांगितली, की मागच्या वेळी कसं भेटलो आपण, कशी ओळख झाली.. मग त्यांच्या लक्षात आलं.. आणि हेही लक्षात आलं की मी एवढ्या पावसातून का आलेय त्यांच्याकडे, त्यांनी न सांगताच ओळखलं होतं की काय घडलं असेल..... तेवढ्यातही ते म्हणाले, तुमाला म्या सांगितलं होतं की नाय, "पोरगिला पुन्यानदा हिकडं ईवून दिवू नगासा !" तुमी ऐकलेलं दिसत नाय वाटतं. बघा घडल का नाय अघटित.. आव, ती वासावरच असत्याती.. कोण घावतयं का न्हाय, ह्यनच्या तडाख्यात....

"देव, करो नी तुमची पोरगी सुखरूप असो ! " चला बिगी बीगी माझ्यासंग, म्या दावतो तुमाला योक माणूस.. लय देवगुणाचा हाय.... त्यो जरुर मदत करील आपली... आनं, पोरगिला बी वाचवलं तुमच्या..

एवढ्या पावसातून हे म्हातारबाबा, माझ्याबरोबर आले.. गावातली अजून एक दोघे जाणती माणसं पण बरोबर घेतली... आणि गाडीत बसून निघालो, गुरुजींच्या घरी..

गुरुजींचं गाव, यांच्या गावापासून पाच सहा किलोमीटर लांब असेल.. पावसानं ओबडधोबड झालेला रस्ता कसातरी पार केला आणि पोहचलो तिथं.. नुकतेच ते आपलं, जप.... नित्यादी काम उरकून, झोपायलाच चालले होते.. तेवढ्यात आम्ही तिथं पोहचलो.. त्यांचा चेहरा अगदी शांत होता... एक निर्विकार, तेजस्वी भाव होता त्यांच्या चेहऱ्यावर.. जसं की त्यांना आधीच हे सगळं माहीत होतं, की पुढे काय घडणार आहे.... " स्वामींचे, निस्सिम भक्त होते ते "

ते म्हणले आलोच, मग लगेच निघू. ते आत घरात गेले, ते त्यांच्या देवघरातून काहीतरी घेऊन आले... पाऊस रपरप पडतच होता. तरीही त्यांनी कशाची पर्वा केली नाही. एवढ्या मुसळधार पावसात तेही बसले आमच्याबरोबर गाडीत. असेच असतात साधुपुरुष सदैव इतरांच्या मदतीसाठी तयार. त्यांच्या बरोबर त्यांनी एक पोथी घेतली होती... केसरी रंगाच्या कपड्यात गुंडाळून ठेवलेली, काहीसे धागे, पवित्र जलाच कमंडलू...

गाडीतूनच त्यांचा जप, मंत्रोच्चार चालू होता... जेणेकरून तिथे पोहचल्यावर काही अघटीत घडू नये.. माझ्या मनातही देवाचा धावा चालूच होता, , काहीतरी पुण्य असेलच की माझं.. पोरगिला वाचव माझ्या.. परमेश्वरा !

जिथे तुझी गाडी उभी होती तिथेचं, माझी गाडीही मी उभी केली.. सगळेजण खाली उतरलो.. पाऊस थांबायचं नाव घेत नव्हता, सगळीकडे चिखल, चालनं काय, उभं राहणंही कठीण होतं त्या जंगलातल्या निसरड्या वाटेत.... तशात हे सगळेजण एकमेकांच्या मागे मागे चालत येत होते.

गुराखी बाबा, वाट दाखवत होते सगळ्यांना.. चालत चालत जंगलाच्या मध्यभागी पोहचलो.. बाबा मधेच थांबले, कारण पुढे स्मशान शांतता होती, पाऊस तेवढा रपरप पडत होता.

तो आपलं काम चांगल्या रीतीने करत होता.. पुढें तो वाडा उभा होता, अंधारात, आपलं आसुरी तोंड घेऊन.. बघताक्षणी धस्स झालं काळजात..

माझी पोरगी इथं फसलेय, कशी असेल, काय झालं असेल तिच्याबरोबर..

गुरुजी म्हणाले, शांत व्हा सगळे.... मुलीला काहीही होणार नाही विश्वास ठेवा सगळे. फक्त कोणीही आवाज करायचा नाही, नाहीतर ती पिशाच्च सावध होतील.. मग मुलीला वाचवणं अवघड जाईल..

वाड्याच्या दरवाजाजवळ गेलो, भलामोठा दरवाजा, पण उघडण अवघड होतं... आणि आवाज करूनही चालणार नव्हतं.. नाहीतर तुझ्या जीवाला धोका झाला असता. तेवढ्यात एक गावकरी म्हनाला, " गुरुजी, मला एक रस्ता माहिती हाय, लय बारकं हुतो तवा आलो हुतो, गुरं चारीत चारीत...... आयन लय बदडल हुत. ! पुण्यानदा तिथं गेलास तर तांगड तुडींन म्हणली हुती ".

तवा काय वाटलं नव्हतं, पण आय म्हणली ते खरं हुत, आता पटतंय मला. मग सगळे त्यांच्या मागे जायला लागलो. खरंच तिथे एक वाट होती. वाड्याची बाहेरची भिंत जीर्ण झाल्यामुळे थोडी पडकी होती.

सगळे तिथून आत गेलो. आता गुरुजी पुढे होते. कारण सगळं त्यांच्यावरच होतं. आमचं व्यवस्थित बाहेर पडण, तुला त्या पिशाच्यांच्या तावडीतून सोडवणं. अजून आम्हाला हेही माहीत नव्हतं की नक्की आत काय आहे, तू कुठे आहेस, कशी आहेस.....

मागच्या पडक्या भिंतीतून आत शिरलो आम्ही सगळे.. अंधारातून नीटस दिसतही नव्हतं, तसंच आम्ही चालत चालत पुढे पुढे येत होतो. आत पोहचल्यावर, गुरुजीनी जे धागे आणले

होते, त्याची वात तयार करुन, ज्योत पेटवली. समोर भलामोठा दरवाजा दिसला, जो आतून बाहेरून दोन्ही बाजूनी बंद होता.....

मला समजेना, मग तू आत आली कशी. नक्की काय घडलं असेल तुझ्याबरोबर.. तोपर्यंत गुराखी बाबा आणि गावकऱ्यांनी तुला इकडे तिकडे शोधायचा प्रयत्न केला, काहीजण वाड्याच्या वरच्या मजल्यावर गेले.. आणि पळत पळत खाली आले. त्यांना काहीतरी सापडलं होतं, हो ते तुझेच कपडे होते. चिखलाने बरबटलेले, पावसाने ओले झालेले.....

माझा बांध फुटला, जो एवढा उशीर धरून ठेवलेला, मी रडायला लागले. गुरुजी म्हनाले रडू नका, काही होणार नाही तुमच्या मुलीला... त्यांनी ध्यान लावून बघितलं तू नक्की कोणत्या जागेवर आहेस. त्यांनी ओळखलं, तू कुठे होतीस, तुझ्या बरोबर काय होणार होतं.

ते म्हणाले लवकर माझ्या मागोमाग या वेळ खूप कमी आहे. फक्त शांत रहायचं जो पर्यंत मी काही सांगत नाही, तोपर्यंत कुणी काही करायचं नाही.

आम्ही सर्वजण गुरुजींच्या मागे मागे जाऊ लागलो. वाड्याच्या अग्रभागापासून थोड्याच पुढे अजून एक खोली होती ती आम्हाला कोणाला दिसलीच नाही, गुरुजींच्या पवित्र शक्तीमुळे त्या खोलीचा रस्ता मिळाला. त्यांच्या मागो माग आम्ही सगळेजण तिथं पोहचलो.

आणि समोर जे दृश्य बघितलं, ते बघुन पायाखालची जमीन सरकली माझ्या, अंगातल सगळं त्राण संपल. आता जीव जातोय की काय माझा असंच वाटलं होतं मला. माझं लेकरू, त्या नरभक्षकांच्या ताब्यात... मृत्यूच्या दारात..

मग गुरुजींच वाक्य आठवलं मला.. "विश्वास ठेवा, तुमच्या मुलीला काहीही होणार नाही ".

त्या पिशच्चीणीने तुझे केस जखडून ठेवले होते..... तुझं डोकं त्या लाकडाच्या ओंडक्यावर ठेवलं होतं.... खाली जमिनीवर सगळे रक्ताचे डाग होते यावरूनच समजत होतं त्या पिशाच्यांनी किती, निष्पाप जिवांचा बळी घेतला असेल, पण आज हे थांबणार होतं.. आणी तो दुसरा पिशाच्....

हातात भला मोठा कोयता घेऊन तुझ्या मानेवर वार करणार तेवढ्यात.... गुरुजींनी... कमंडलू मधील पवित्र जल त्या पिशाच्याच्या अंगावर काही मंत्र म्हणत शिडकवलं...... त्याच्या हातातील कोयता अलगद निसटून पडला खाली, , त्या पिशाच्याला समजलंच नाही, नक्की काय झालं... हा.... हूं.... हह.... हह.... जोराजोरात आवाज करत त्याने मागे वळून पाहिले.....

छिन्न विच्छिन्न झालेलं त्याचं शरीर, रक्त गळत होतं त्यातून.. आधी त्याला समजलंच नाही काय होतंय.. नंतर मानवी शरीर बघितल्यावर तो आमच्या वर चाल करून यायला लागला...... ज्या पिशच्चीणीने तुला जखडून ठेवलं होतं, तीही उठली..... त्यांना मेजवानीच मिळणार होती आज चांगली, इतकी मानस दिसतायत म्हणल्यावर..... तुला तिने धपकन खाली टाकून दिलं.. आणि तीही आमच्याकडे यायला लागली.

गुरुजींनी मला हळूच सूचना दिली, की तुला तिथून घेऊन यावं... गुरुजींनी आणि गावकऱ्यांनी त्या दोन्ही पिशाच्याचं ध्यान त्यांच्याकडे आकर्षित केलं.. आणि मी हळूच जाऊन तुला तिथून घेऊन आले. आणि या सर्वांपासून बिलकुल लांब उभी राहिले... जेणेकरुन ती पिशाच्च, पुन्हा तुझ्यावर ताबा मिळवू नयेत.

आता खरी कसोटी होती, गुरुजींची.. गावकऱ्यांची... ती दोन्ही पिशाच्च, आपलं अक्राळ विक्राळ रूप घेऊन, आपले अवजड पाय उचलत, गुरुजी आणि गावकर्यांकडे येत होते..... हसत होते हा... हा हा... हि हि... हि.... एवढी सगळी सावज..... खेळ चांगला रंगणार आता... एका भक्षकाच्या बदल्यात एवढी सगळी नरदेह खायला मिळणार आपल्याला..... कित्येक कित्येक वर्षे तिष्ठत बसावं लागायचं, एक शरीर मिळण्यासाठी... आणि आजही आपल्या पायांनी चालत आली आहेत.... ह्या पोरीलाच वाचवायला आला आहात ना तुम्ही सगळे.... खूप मोठी चूक केली तुम्ही सगळयानी इथं येऊन, आमच्या सावजाला तर नेऊच शकणार नाही आणि आता तर तुमची पण गय नाही... कोणीच वाचणार नाही कोणीच वाचणार नाही, एकदा कोणी या वाड्यात पाऊल टाकलं की पुन्हा त्याची आत्माही इथून बाहेर जाऊ शकत नाही.. असं बोलत तो नर पिशाच् जोरजोरात हसायला लागला.... आणि त्या पिशच्चीणीने खुश होऊन जोराची किंकाळी मारली.... सारा वाडा हादरला या आवाजाने....... मला जास्तच भीती वाटू लागली हे सगळ बघुन.... तुला तरी वाचवू शकतो की नाही, की आमचेही मृतदेह पडणार इथं.

पण, त्या पिशाच्याना कुठे माहीत होतं, की आज त्यांचा अमानवी खेळ संपणार होता.. इथून पुढे या वाड्यावर या जंगलावर त्यांच राज्य नव्हतं चालणार..

जस जसं ते दोघे पुढे येत होते, गुरुजी आपला पवित्रा घेत होते, त्यांनी गुराखी बाबा आणि अजून दोन गावकऱ्यांना, गुरुजी जे धागे घेऊन आले होते.. ते धागे हातात घायला सांगितले.. आणि ते धागे या दोघांच्याभोवती अशा रीतीने गुंडालायला संगितले की त्या पिशाच्यांना कळणारही नाही..

ते दोघे असुरी हास्य करत, जोरजोरात आवाज करत.. गुरुजींपासून बस एका हाताच्या अंतरावर येऊन पोहचले होते.. त्यांना पकडण्यास ते दोघे हाथ पुढे करणारच तेवढयात त्या

दोघांना जोराचा झटका बसला आणि ते दोघेही काही समजायच्या आत विद्युत वेगाने मागे फेकले गेले..

मलाही काही समजलं नाही असं काय झालं अचानक.. " साधे सुधे नव्हते ते धागे, दैवी शक्तीने मंतरलेले होते.... गुरुजींची एवढ्या वर्षाची साधना होती त्यात. "

त्या दोन्ही पिशाच्यांनी, उठून पुन्हा प्रयत्न केला उभ्या असलेल्या मानवी शरीरांना आपल्या काबीज करायचा. पण त्यांचा तोही प्रयत्न असफल झाला, , जोरजोरात किंचाळत ते दोघे पुन्हा मागे फेकले... आपली असुरी शक्ती काही एक चालेना, यामुळे ते दोघे पेटून उठले होते... बदला घेऊ या सर्वाचा आम्ही बदला... कोणालाही नाही सोडणार.... आकांडतांडव चालू होता त्या दोन पिशच्यांचा... कारण ते त्या पवित्र धाग्याच्या रिंगणात अडकले गेले होते किंचाळत होते, ओरडत होते.... त्या आवाजाने कान सुन्न झाले होते.... वाड्याने आजपर्यंत मानवी किंकाळया ऐकल्या असतील... आज मात्र तोच असुरी वाडा... त्याच्या धन्याच्या किंकाळया ऐकत होता.... बघ म्हणावं त्या वाड्याला.... एक ना एक दिवस सगळयांची बाकी पुरी होते, मग ती अमानवी शक्ती का असेना.. भूत पिशाच्च का असेना... अंत ठरलेला आहे... अटळ आहे...

त्या पवित्र धाग्याला स्पर्श होताच पुन्हा ते तसेच मागे फेकले गेले. एवढी वर्ष भितीमुळे कोणी करू शकल नाही ते आज होत होतं..... त्या अमानवी पिशाच्यांचा खेळ आज संपणार होता... ओरडत होती किंचाळत होती ती दोन्ही पिशाच्च..... गुरुजींच्या पवित्र आत्म्याला ती स्पर्श देखिल करू शकली नव्हती....

गुरुजींनी ते कमंडलू मधील पवित्र जल आपल्या हातावर घेतलं आणि त्या धाग्यावर शिंपडलं.... तस ते एक दोन असणार धाग्याच रिंगण अचानक वाढू लागलं... दोन... चार...

दहा.... म्हणत म्हणत त्या पिशांच्यापेक्षाही मोठा धाग्यांचा डोंगर उभा राहिला.... पिशाच्च धडका देत होते बाहेर निघण्याचा प्रयत्न करत होते.. पण सर्व प्रयत्न विफल होते... त्यांची शिक्षा त्यांना मिळणार होती... गुरुजींनी त्या वस्त्रात गुंडाळलेली ती पवित्र पोथी बाहेर काढली... प्रणाम करून त्यातली काही अक्षरे वाचली आणि पुन्हा कमंडलू मधील पवित्र जल त्या मन्तरलेल्या धाग्यांवर, जिथं त्या नरभक्षकांना बंदिस्त केलं होतं त्यावर शिंपडले... असं करताच त्या धाग्यांनी पेट घेतला....

ती दोन्ही पिशाच्च भेसूर आवाजात ओरडू लागली.... सोडणार नाही तुम्हाला... नाही सोडणार..... बघून घेईन...... ब........ घ...... ऊं ऊं ऊं ऊं _ _ _ _ _ नं _ _ _ _

असं म्हणत दोघांनी जोराची किंकाळी फोडली...... आणि ती शेवटची किंकाळी होती...... त्या नरभक्षक.... अमानवी.... श्वापदांची........

गुरुजींनी आपली पोथी होती तशी त्या वस्त्रात गुंडाळली... आपलं पवित्र कमंडलू हातात घेतलं आणि आम्हा सर्वांना म्हणाले.... जर या पिशच्यांचा मुळापासून नायनाट करायचा असेल तर हा वाडा देखील नष्ट करावा लागेल... कोणत्याही क्षणी वाडा पेट घेवू शकतो, आपल्याला तुरंत इथून निघालं पाहिजे....

सगळयानी आपला होकार भरला. सगळेजण व्यवस्थित आहेत ना याची खात्री केली आणि एका क्षणाचा विलंबही न करता तिथून निघालो.... जो वाड्याचा दरवाजा मघाशी यायच्यावेळी आतून बाहेरून बंद होता तो सताड उघडा झाला होता, जायच्या वेळी....

कोणासठाऊक त्या वाड्यालाही कळलं असेल आता आपला शेवट निश्चित आहे... संपता संपता तरी एखाद चांगल काम करावं... वाड्यातून बाहेर निघतो न निघतोच धाड धाड करीत वाड्याने पेट घेतला... एवढ्या मुसळधार पावसातही त्याने पेट घेतला होता.... कदाचित

त्यालाही केव्हापासून चालत असलेला हा राक्षसी.... पिशच्ची... अमानवी खेळ संपवायचा असेल.....

एकदा सुद्धा मागे वळून पाहिलं नाही आम्ही त्या जागेकडे... घृणा.... वीट... आल्यासारख वाटतं होतं तिथे.... तडक आम्ही सगळेजण गाडीत बसलो... इतका वेळ मी तुला... जस लहानपणी घ्यायचे तस कडेवर घेऊनच होते... अजून तू शुद्धीत नव्हती... एवढा मोठा धक्का च बसला होता तुला... तुला गाडीत नीट ठेवलं... गुरुजी.. गुराखी बाबा आणि गावकरी यांना म्हंटलं... पाऊसही खुप आहे आणि अजून शिवानीला जाग आली नाही... जोपर्यंत ही शुद्धीत येत नाही.. प्लिज तोपर्यंत मला तुम्हा सर्वांची गरज आहे... तुम्ही माझ्या घरी चला... हवं असेल तर मी उद्या तुम्हाला सोडते तुमच्या घरी... एवढ्या मोठ्या संकटातून वाचवलं... "अजून एक उपकार करा, या अभागी आईवर "

गुरखी बाबा म्हणाले, ताईसाहेब ! तुमची पोरगी.. माणुसकीच्या नात्याने ती आमची बी हाय.. तुमी काय बी काळजी करू नका.. पोरगी शुद्धीत येस तोवर आमी कुठबी जाणार न्हाय... गुरुजीही म्हणाले.. ठीक आहे...

मग आम्ही सगळे तुला घेवून घरी आलो... माघारी येताना गाडीतून मागच्या बाजूला त्या वाड्याच्या आगीतून हिरवट पिवळसर धूर निघताना तेवढा दिसत होता.. बाकी काही बघायचं नव्हतं आम्हाला त्या वाड्याकडे.. त्या जागेकडे..

कशी बशी ड्राईव्ह करत.. घरी पोहचलो... तुला सर्वांनी अलगद उचलून घरात आणलं... तुझ्या शुद्धीत येण्याचीच वाट बघत होतो आम्ही सगळे... त्याशिवाय कोणी पाणीही पिणार नाही म्हनले होते...

आणि तुला जाग आली... तेही "आई " म्हणत...

बेटा, घाबरायची काहीही गरज नाही.. खूप मोठ्या संकटातून वाचलेयस तू... आणी तुझी मम्मा असताना... तुला काही होणं, शक्य तरी होतं का....

मम्माने असं बोलताच शिवानी तीच्या गळयात पडून रडू लागली.... दोघींच्याही डोळयांत अश्रू होते... खुशीचे... मृत्यूच्या दारातून परत आणलं होतं... एका आईने आपल्या लेकीला... आणि लेकीच्या डोळयात अश्रु होते कारण... ती पुन्हा भेटली होती आपल्या लाडक्या मम्मा ला....

बाळा ! या सर्वांचे आशीर्वाद घे, आणि आभार मान सगळ्यांचे.... गुराखी बाबा म्हणाले, पोरी... आशीर्वाद या गुरुजींचा घे... त्येंचा मदतीशिवाय आमी काय बी करू शकलो नसतो... आणि तुझी आई मोठी हिम्मत वाली.. म्हणून तितवत पोचलो आमी...

शिवानी गुरुंजी जवळ गेली आशीर्वाद घायला... त्यांनी तिला... खांद्याला पकडून वर उठवले.. म्हणले.. "बाळा ! आशीर्वाद घायचे असतील तर परमेश्वराचे घे... आभार ! मानायचे असतील तर परमेश्वराचे मान... कारण... कर्ता करविता तोच आहे... हा निमित्त मात्र मी होऊन जातो "...

गुरूजींच्या चेहऱ्यावर स्मित होतं... अजून काहीतरी चांगल केल्याचं... तिने गुराजींच्या जवळ जी पोथी होती त्याचे आशीर्वाद घेतले.. आणि आई जवळ आली...

म्हणाली.. मम्मा, सॉरी ना ! पुन्हा अशी चूक नाही होणार, , पुन्हा कधी कधी नाही सोडून जाणार मी तुला, असं भांडून, रागावून, असा मूर्खपणा पुन्हा नाही करणार...

आई बोलली एकाच अटीवर मी माफ करेन ?... शिवानी, बोलली... सांग मम्मा तू एवढं केलंस माझ्यासाठी, मी तुझ्यासाधी एक अट मान्य करू शकत नाही..

मम्मा, बोलली ! प्रॉमिस कर इथून पुढे मला सोडून कुठेही जाणार नाही...

प्रॉमिस ! मम्मा, इथून पुढे मी कुठे कुठे जाणार नाही तुला सोडून. अगदी तू जा म्हणाली तरी....

शिवानीचं हे बोलन एकूण तिथले सारे हसायला लागले.... हे हसू आनंदाच होतं.... खुशीच होतं... एक निष्पाप जीव वाचवल्याचं.... पिशाच्ची शक्ती संपवल्याच....

माझी मम्मा, , प्यारी मम्मा, , आय लव्ह यु, मम्मा ! म्हणत शिवानीने आईला घट्ट मिठी मारली.... आईही बोलली. लव्ह यु टू... माझा बच्चा.... !

©वैशु पाटील.....

( इति श्री.... "त्या भयानक रात्री " लिहून सुफळ सम्पूर्ण...... आशा आहे वाचक प्रेमींना माझा हा प्रयत्न आवडेल... )

(कथेतील, पात्र, घटना, स्थान सर्व काल्पनिक आहे. याचा कुठल्याही जीवित व्यक्ती या वस्तूही संबन्ध नाही )

(हा यातील जी आई आहे ती जरूर मला दर्शवते, मलाच काय जगातील प्रत्येक आईला. जी कितीही संकटं येऊदेत आपल्या मुलावर केव्हा आच येऊ देत नाही. त्यातून आपल्या मुलाची सुटका करते, मग तिला कितीही त्रास का सहन करावा लागेना... " अशा प्रत्येक आईला माझा, सलाम ")

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.सगळं काही पैशानंच करायचा अट्टाहास नाही चालणार.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

एक प्रसन्न अनुभव